International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# मराठी साहित्यात रुजणारा नवप्रवाह : पारलिंगी साहित्य प्रवाह

**डॉ. नवनाथ विश्वनाथ पाटोळे**

*शरदचंद्र पवार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोलापूर*

*Corresponding Author – डॉ. नवनाथ विश्वनाथ पाटोळे*

DOI - 10.5281/zenodo.18654277

**प्रस्तावना:**

भारत हा वैविध्यपूर्ण देश आहे. देशात समतावादी समाज रचनेची खात्री करणे ही एक विकसित होणाऱ्या समाजाची आवश्यकता असते. यासाठी सामाजिक बदलाचे प्रयोग झाले पाहिजेत. या बदलांना चालना देण्यासाठी साहित्याची भूमिका फार महत्त्वाची असते. या सामाजिक बदलांमध्ये तृतीयपंथियांचे किंवा पारदर्शियांचे साहित्य महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतात. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रातून तृतीयपंथीयांची होणारी हेळसांड त्यांच्या साहित्यातून चित्रित होते. समाज त्यांना आपलेसे करीत नाही. याविषयी मणीपुरी लेखिका सांता खुरई म्हणतात, "माझ्या वडीलांनी माझ्या स्त्री स्वभावाबद्दल सतत नाराजी व्यक्त केली. तर माझ्या आईला, शेजारी, नातेवाईक आणि मैत्रिणीसमोर सतत अपमानित वाटत होते." अशा प्रकारचे जीवन जगताना तृतीयपंथियांचे साहित्यात खूप कमी प्रमाणात चित्रण झाले आहे.

**तृतीयपंथीयांची व्याख्या व स्वरूप:**

'तृतीयपंथी' हा शब्द मुख्यतः तृतीय लिंगीय पुरुषवाचक संज्ञासाठी वापरला जातो. सर्वसाधारणपणे लोक त्यांना 'हिजडा' संबोधतात. त्याचप्रमाणे पारलिंगी, किन्नर या नावांनीही त्यांना ओळखले जाते. 'किन्नर' या शब्दासाठी समाजातून विशेषतः हिमाचल प्रदेशातून विरोध झाला आहे. असे असले तरी समाजामध्ये या शब्दाचा वापर सर्रासपणे केला जातो. संस्कृतमध्ये 'किन्नर' या शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला आहे,

"बुरा या विकृत, पुराणोक्त पुरुष, जिसका सर घोडे का हो, तथा शेष शरीर मनुष्य का"[१] म्हणजेच ज्या व्यक्ती शरीराने विकृत असतात किंवा शारीरिक व्यंग्य असतात, ज्यांचा समावेश स्त्री किंवा पुरुषात केला जात नाही, त्यांना किन्नर म्हणतात. याच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील –

१) ऑक्सफर्ड डिक्शनरी - "Adj. Impotent cowardly limit."[2]
(नपुसकत्व ज्याला आहे तो.) म्हणजे ज्याचा समावेश स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये होत नाही, अशी व्यक्ती.

२) Advance learning Dictionary - "Civil Law. An impartment person One unable to procreate."[३]

३) Oxford Dictinary - "Eunuch a dancing boy."

म्हणजेच ज्याचा तृतीयपंथीयात समावेश आहे, परंतु तो नाचतो त्याचप्रमाणे तो पुरुष आणि स्वी यामध्ये मोडत नाही.

वरील व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर लक्षात येते की, तृतीयपंथी किंवा किन्नर हा शब्द व्यापक अर्थानी

अभ्यासकांनी वापरला आहे. या दोन शब्दांना पर्यायी शब्द म्हणून 'हिजडा' 'पारलिंगी', या शब्दांचा वापर केला जातो. हिजडा' हा शब्द उर्दू भाषेतील आहे. याचा अर्थ "जो नपुसक आहे तो. जो पुरुष असून स्त्री आहे आणि लैंगिकदृष्ट्या विकलांग आहे." बाहेरुन जरी स्त्री दिसत असला तरी नैसर्गिक दृष्ट्या पुरुष आणि स्त्री यांमध्ये मोडत नाही. अशा व्यक्तींचे प्राचीन काळापासून साहित्यात चित्रण झाले आहे.

**प्राचीन साहित्यातील तृतीयपंथीयांचे चित्रण:**

ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या तृतीयपंथीयांना प्रत्येक धर्मात व धर्मग्रंथात महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे तृतीयपंथीयांची उत्पत्ती नेमकी केव्हा झाली हे स्पष्टपणे सांगता येत नाही. प्राचीन ग्रंथांप्रमाणे लेण्यांमध्ये व गुहांमध्ये त्यांच्या खुणा सापडतात. अजंठा लेणी, वेरुळ लेणी, एलिफंटा लेणी या लेण्यांमध्ये निम्मे शरीर पुरुषाचे व निम्मे शरीर स्त्रीचे असलेल्या 'अर्धनारी' अर्थात 'शिवा' च्या मुर्त्या सापडलात.

पुराणात संगीत आणि नृत्याच्या तीन देवतांचा उल्लेख केला आहे. त्या तीन देवता म्हणजे 'अप्सरा, (स्त्री), 'गंधर्व, (पुरुष) व 'अर्धनारी नटेश्वर' हे तृतीयपंथी अथवा पारलिंगी यांचे रूप मानले जाते. बौध्द साहित्यात पुरुष, स्त्री आणि पुरुष- स्त्री यांचे गुण असलेले 'पंडाका' याचे चित्रण आले आहे. यातील पंडाका म्हणजे मूळचे पुरुषांच्या लैंगिक क्षमतेची कमतरता दर्शविणारे लोक. विनया परंपरा विकसित होत असताना पंडाका हा शब्द एका व्यापक तृतीय लिंगा साठी वापरला आहे. बौद्ध विन्यामध्ये ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकात विनया परंपरा विकसित होत असताना 'पंडक' हा शब्द तृतीय लिंगासाठ वापरण्यात आला आहे. 'पंडका मध्ये आंतरालिंगी पुरुष व स्त्री शरीर असलेल्या शारीरिक किंवा वर्तणुकीशी संबंधित गुणधर्म आलेले आहेत. यात पुरुष आणि स्त्री च्या नैसर्गिक वैशिष्ट्यांशी विसंगत आहे.

पतंजलीच्या व्याकरणात तीन लिंगे आढळतात. यातील तिसरे लिंग नपुसकलिंग, नपुसकलिंग म्हणजे जे पुलिंग (पुरुषवाचक) आणि स्त्रीलिंग (स्त्रीवाचक) नाही. संस्कृत भाषेत सुध्दा तीन लिंगे वापरली आहेत. म्हणजेच व्याकरण लिहितानासुध्दा तृतीयपंथियांसाठी तिसरे लिंग वापरलेले आहेत. त्याचप्रमाणे संस्कृत महाकाव्यात, रामायण, महाभारत या प्राचीन ग्रंथात तृतीयपंथियांचे अस्तित्व सूचित केले आहे.

**भारतीय साहित्यातील तृतीयपंथियांचे चित्रण:**

तृतीयपंथियांना मानसिक आणि शारिरीक लिंग यांच्यात समन्वय नसल्याने त्यांना समाजाने नेहमीच वाईट वागणूक दिली आहे. समाजाने त्यांचे शारीरिक व मानसिक शोषण केले आहे. तृतीयपंथियांविषयी समाजात उदासिनता असल्याने त्यांच्यासाठी कायद्याचे दरवाजे कमी प्रमाणात खुले आहेत. तृतीयपंथीयाविषयी मानक लैंगिक संबंधांची प्रणाली मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून खूप खोलवर रुजल्याने त्यांच्या हक्कांसाठी नवीन कायदे निर्माण करणे आवश्यक आहेत. तृतीयपंथियांना कायद्याचे संरक्षण नसल्याने समाजातील लोक त्यांची थट्टा व लैंगिक शोषण करतात. याचे चित्रण भारतीय साहित्यात आले आहे. त्याचप्रमाणे इंग्रजी साहित्यामध्ये ओल्गा बी. आरॉन, सारख्या तृतीयपंथियांनी आपल्या शारीरिक वेगळेपणाची व दुःखाची समाजात होणाऱ्या अवहेलनांची जाणीव करून दिली आहे.

**विद्या रजपूत:**

पुरुष आणि स्त्री यांच्या अपूर्णतेची स्वतःमध्ये झालेल्या जाणिवेच्या अपूर्णतेची लढाई विद्या रजपूत आपल्या साहित्याच्या माध्यमातून लढताना दिसतात.

त्यांच्या स्वतःच्या शरीरातील अस्वस्थता आणि त्यांची समाजातील अस्वीकारार्हता यांना विद्या रजपूत बळी पडलेल्या दिसून येतात. यामध्ये कोणत्याही तृतीय पंथियांचा दोष नसतो, परंतु त्यांच्यातील शारीरिक बदल है नैसर्गिक आहेत, हे समाज मान्य का करीत नाही. याचे चित्रण साहित्यात करताना विद्या रजपूत म्हणतात,

" होय, मी निसर्ग आहे,
मी अंधारातून बाहेर पडणारा प्रकाश आहे,
होय, मी आहे पहाट,
मी स्त्री आणि पुरुषांचा संगम आहे,
होय, मी खरोखरच अर्धनारीश्वर आहे,
मी पृथ्वी आहे, जमीन आणि पाणी,
होय, मी एक किन्नर आहे."

वरील कवितेत विद्या रजपूत यांनी वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला आहे. निसर्गाने जर आम्हाला तृतीयपंथिय म्हणून तयार केले असेल तर त्याला ते मान्य आहे. निसर्गाला जर आम्ही मान्य आहे, तर समाजाला का नाही? या प्रश्नाचा आशावाद ते वरील कवितेतून व्यक्त करतातः स्वतः किन्नर अर्थात तृतीयपंथी असल्याचे ते मान्य करतात. याचे चित्रण त्यांच्या साहित्यात येते.

**कल्की सुब्रम्हण्यमः**

कल्की सुब्रमण्यम यांची 'द मिरर' या कवितेत स्वतः आरशासमोर उभा राहून स्वतःलाच शोधण्याचा प्रयत्न करताना म्हणतात,

"मी रोज आरशात पाहतो,
आणि मला दिसत नाही,
मी त्याला पाहतो,
तो मी नाही."

(द मिरर)

त्याचप्रमाणे 'अ वुमन डॅड या कवितेत त्या म्हणतात,

" मुलाला निरोप दया,
मी कोण होती,
सर्व नवीन माझ्यासाठी आनंदात स्वागत आहे."

(द वुमन डॅड)

तृतीयपंथीयांना स्वतःला ओळखता येत नाही. या जगाच्या पाठीवर स्वत:चे अस्तित्व काय आहे? याचा ते शोध घेण्याचा प्रयत्न करतात. त्यांची आई आणि वडील बनण्याची इच्छा निसर्गाने मारुन टाकली. यात तृतीयपंथीयांचा काय दोष? हा प्रश्न कवीला पडतो. स्त्री आणि पुरुष यांच्या भावना वेगवेगळ्या आहेत. परंतु तृतीयपंथीयांच्या भावना या दोघांपेक्षा वेगळ्या आहेत.

कल्की यांचा २०१५ मध्ये 'कुरी अरुथियन' हा कविता संग्रह विकटन पब्लीकेशनने प्रकाशित केला. त्यात एकूण २५ कवितांचा संग्रह असलेल्या कवितांमधून तृतीयपंथीयांच्या शोकांतिका, त्यांच्या वेदना, त्यांचा आक्रोश मांडला आहे. त्यांच्या लैंगिक असमानतेचा प्रत्यय त्यांच्या कवितांत पदोपदी जाणवतो.

**भैरबी अमरानी:**

भैरबी अमरानी यांची 'द मिरर' नावाची एक छोटी कथा प्रकाशित झाली होती. त्यात ते तृतीयपंथीयाचे वास्तवपणे चित्रण करतात. त्या कथेचा नायक मानव आहे. मानव हा आपल्या स्वतःचे प्रतिबिंब आरशात पाहतो. तो आरशात स्वतःला पाहून आरशातील दुसऱ्या मानवाला संवाद साधतो. आरशातील मानव खऱ्या मानवला म्हणतो, 'स्वतःला शोधण्याची ताकत फक्त तुझ्यात आहे. मानव, खरी सत्यता तुमच्या अस्तित्वाचे वेगळेपण आत्मसात करण्यात आहे. लिंग हे काही नाही, कठोर रचना. परंतु त्याऐवजी, एखाद्याच्या आंतरिक भावनेची द्रव

अभिव्यक्ती.' या कथेतील मानव हा जीवनाला दुय्यम स्थान देतो. वासना म्हणजे प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याचे सर्वस्व नसते, तर ती आयुष्याचा एक भाग आहे. व्यक्तीच्या आयुष्यात भावना महत्त्वाची आहे. ज्याला मानव आयुष्यात महत्त्व देतो. ही भावना एकट्या मानवची प्रातिनिधिक स्वरुपात आली आहे, मानवसारख्या अनेक तृतीयपंथियांची ही शोकांतिका आहे.

**लक्ष्मी नारायण त्रिपाठी:**

लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांनी 'मैं हिजडा, मैं लक्ष्मी' या नावाने आत्मकथन लिहिले. या आत्मकथनात त्यांनी त्यांच्या लहान पणापासून ते किन्नर आखाड्यापर्यंतचा प्रवास मांडला आहे. उच्चवर्गीय ब्राम्हण कुटुंबात जन्मलेल्या लक्ष्मी यांना लहानपणीच आपल्यामधील लैंगिक बदलाची जाणीव झाली. त्यामुळे त्यांना समाजाच्या शारीरिक व मानसिक शोषणाला सामोरे जावे लागले. या शोषणातून मुक्तता मिळविण्यासाठी हिजडा समुदायात प्रवेश करुन प्रसंगी मुंबई येथील बारमध्ये नर्तिका म्हणून काम केले. हा सगळा जीवनप्रवास त्यांनी प्रस्तुत आत्मकथनात उलगडला आहे. एकूनच हे आत्मकथन वाचल्यानंतर वाचकांचा तृतीयपंथीयांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलेल, याचा विश्वास वाटतो. याविषयी अमितकुमार म्हणतात, " लक्ष्मी नारायण त्रिपाठी केवळ त्यांच्या स्वतःच्या जीवनाला नवीन अर्थ देत नाहीत, तर ज्यांना स्वतःच्या जीवनाचे मूल्य नाही, अशा सर्वांच्या जीवनासाठी पाया प्रदान करण्याचा प्रयत्न करतात. लक्ष्मी विविध संस्थांद्वारे लिंगापलिकडे मानवतेच्या स्थापनेवर भर देतात. ते अशा समाजाची कल्पना करतात. ज्यामध्ये तृतीयपंथीयांना वेगळे स्थान नसते, परंतु ते समाजात एकत्रित असतात. समाजाने लिंगाच्या आधारावर अशा व्यक्तींपासून स्वतःला दूर ठेवू नये, परंतु कोणताही भेदभाव न करता त्यांच्याशी संवाद साधत राहावे." [५] तृतीयपंथीय हे आपल्यातीलच आहेत व ते सुध्दा समाजाचा घटक आहेत, याची जाणीव प्रत्येक व्यक्तीला असली पाहिजे. त्यांच्या बरोबर वर्तणूक सुध्दा आपण सामान्यपणे केली पाहिजे.

**देवयानी:**

देवयानी यांनी 'किनारा : एक किन्नर की आत्मकथा' हे आत्मकथन प्रकाशित केले. त्यांनी आपल्या या आत्मकथनात तृतीय पंथीयांविषयी समाजात असणारी तिरस्काराची भावना, त्यांचे दुःख व तृतीयपंथियांचे अस्तित्व यांचे चित्रण केले आहे. एक तृतीयपंथीय म्हणून कुटुंब आणि समाजाने त्यांचे शोषण केले आहे. या आत्मकथनाचा नायक हर्षा हा लैंगिक शोषणाला तरुण वयात बळी पडतो. एकदा तृतीयपंथीय समाजात तो सामील झाला की, त्याला ना समाज स्वीकारतो, ना कुटुंब स्वीकारते. या सर्व जीवनप्रवासाला कंटाळून हर्षा शेवटी आत्महत्या, करण्यासाठी तयार होतो. हे आत्मकथन् म्हणजे हर्षित ते हर्षा यांचा जीवनप्रवास वाचकांसमोर ठेवते.

एकूनच, वरील साहित्याचा अभ्यास केल्यानंतर भारतीय साहित्यातील एक नवीन विचारप्रवाह म्हणून मानला गेला पाहिजे. त्यांनी जरी वेगवेगळया भाषेत लिहिले असले तर ते अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतपत लिहिले आहे.

**मराठी साहित्यातील तृतीयपंथीयांचे चित्रण:**

अमळनेर येथे २ ते ४ फेब्रुवारी २०२४ मध्ये ९७ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन पार पडले. या संमेलनात तृतीयपंथीयांच्या साहित्यावर विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. याचा उद्देश होता की, तृतीयपंथीयांना साहित्याच्या मूळ प्रवाहात आणणे. यामध्ये तृतीयपंथीयांसाठी पहिल्यांदा पारलिंगी हा शब्द वापरला. या

परिसंवादात तृतीयपंथीयांच्या साहित्यावर चर्चा करण्यात आली. त्यातून मराठीमध्ये केवळ ७-८ पुस्तकांमध्ये त्यांचे जीवन चित्रण केली आहे.

**अण्णाभाऊ साठे:**

अण्णाभाऊ साठे यांनी ‘बरबादया कंजारी’ या पुस्तकात तृतीयपंथीयांचे चित्रण केले आहे. मराठी साहित्यात त्रोटकपणे का होईना अण्णाभाऊंनी तृतीयपंथीयांना मराठी साहित्याप्रवाहात आणले. त्यांनी तृतीयपंथीयांची होणारी अवहेलना प्रथम मराठी साहित्यात मांडली.

**दिशा पिंकी शेख:**

दिशा पिंकी शेख यांचा पहिला कवितासंग्रह इ.स. २०२१ मध्ये ‘कुरूप’ या नावाने प्रकाशित झाला. प्रस्तुत कवितांमधून तृतीयपंथीयांच्या जीवनाचे वास्तव चित्रण करण्यात आले. 'टीव्हीवर सिनेमा चालू व्हता' या कविलेत त्या म्हणतात,

'टीव्हीवर सिनमा चालू व्हता,
नायक विद्रोह करत होता,
व्यवस्थेच्या विरोधात, शोषणाच्या विरोधात,
आणि टीव्हीच्या बाहेर आहे मी,
हे विसरून नकळत पेटून उठले, ,
मुठी आवळल्या गेल्या घट्ट
जसा नायकाचा विद्रोह,
अटळ त्याला जनतेची साथ,"

प्रस्तुत कवितेतील नायक विद्रोह करताना दिसतो. पुढे त्या म्हणतात,

" चित्रपट तीन तासांत संपतो,
वास्तव संहितेवर नाही जगत,
याचा मला विसर पडला होता.
आणि मी भानावर आले.”

या कवितेतील तृतीयपंथी असणारा नायक एका सिनेमात गुंतला आहे. तो नायक या कवितेत अन्यायाविरुध्द लढतो. त्याचप्रमाणे तो प्रचलित व्यवस्था, पुरुषसत्ताक परंपरा, सामाजिक शोषण यांच्याविरोधात बंड करतो. त्याचा लढा प्रत्येक वास्तव न जीवन जगणाऱ्या तृतीयपंथीयाचा आहे.

**शमिमा भानुदास पाटील:**

शमिभा पाटील यांचा ‘खंत' हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. यात त्यांनी स्वतः तृतीय पंथीय असल्याने त्यांच्या वेदना मांडल्या आहेत. समाजाचा तृतीयपंथीय समुदायाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो. समाज त्यांना आपलेस मानत नाही, अशी खंत प्रस्तुत कवितांसंग्रहातून त्या व्यक्त करतात.

**स्वाती चांदोरकर:**

स्वाती चांदोरकर यांचे 'हिज डे' ही पहिली कादंबरी प्रकाशित झाली. या कादंबरीत हेलेना आणि चमेली या दोन नायिका आहेत. हेलेनाला तृतीयपंथीयांना जाणून घेण्याची प्रबळ इच्छा आहे तर चमेली ही साधारण मुलगी आहे, पण तिचे पालक तृतीयपंथी आहेत. या दोघींच्या कथेतून तृतीयपंथीय समुदायाची कहाणी आकारास येते तृतीयपंथीय तरुण असताना व्यवस्थित जीवन जगतात. परंतु वृद्धावस्थेत त्यांची होणारी अवहेलना प्रस्तुत कादंबरीत मांडली आहे. त्याचप्रमाणे समलिंगी संबंधावरही लेखिकेने प्रकाश टाकला आहे.

**राजन गवस**:

राजन गवस यांची 'भंडारभोग' ही कादंबरी तृतीयपंथीयांच्या जीवनावर आधारित प्रकाशित झाली

आहेत. ‘भंडारभोग' या कादंबरीमध्ये देवदासी व जोगते यांचे चित्रण केले आहे. जोगत्यांच्या आयुष्याचे चित्रण करताना राजन गवस म्हणतात, 'जोगत्याच्या तिरडीला माणूस मिळणं कठीण... त्याचा स्पर्शही इंगळीसारखा.... त्याच्या नशिबी फक्त अंधार..? जोगती हा पुरुष असतो. परंतु रुढी-परंपरा यामुळे त्याचं सगळं आयुष्य अंधारमय होतं. हीच या कादंबरीची मध्यवर्ती कल्पना आहे.

**पारु मदन नाईक:**

पारु मदन नाईक यांनी 'मी का नाही’ ही तृतीय पंथीयांवर आधारित कादंबरी लिहिली. या कादंबरीची नायिका 'नाझ' आहे. परंतु नाझच्या आयुष्यात जे दुःख येते तेव्हा तिच्या पाठीशी तिची आई वडिलांचा विरोध झुगारून उभी राहते. आईच्या पाठबळाच्या जोरावर नाझ हिजडा समाजाची स्थापना करते. हिजडा समुदायाला न्याय देण्यासाठी ती चळवळ उभा करते. स्वतःचे प्रश्न सोडविण्यासाठी ती समाजातील टिंगळ-टवाळीला न जुमानता थेट कोर्टात जाते व 'मी का नाही' या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेण्याचा प्रयत्न करते. या प्रश्नाचे उत्तर शोधताना वाचक अस्वस्थ व निराश होतात.

**राहुल शिंदे**:

राहुल शिंदे यांचा 'मुक्त झाले मानवी अश्रू' हा कथासंग्रह प्रकाशित झाला. या कथासंग्रहातील कथा समाजातील माणसांच्या भेटण्यातून आल्या आहेत. त्या कथांना आंतरिक अवस्थांची आणि अनुभवाची जोड आहे. या कथासंग्रहातील कथा कोंडलेल्या मनाला वाट मोकळी करून देतात. वेदनेच्या काळात अश्रूंना मोकळी वाट करून देणाऱ्या आहेत. मानवी जीवनाचे, वेदनेच्या पलिकडे काय अस्तित्व आहे. या शोध प्रस्तुत कथांमधून राहुल शिंदे यांनी घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**मनोबी बंडोपाध्याय:**

मनोबी बंडोपाध्याय यांच्या आत्मकथनाचा 'होय, मी स्त्री आहे' या नावाने सीमा भानू योनी अनुवाद केला आहे. लहानपणापासून जाणवत गेलेले शारीरिक वेगळेपण ते एका महाविद्यालयातील प्राचार्यपद येथपर्यंतचा जीवनप्रवास मनोबींनी प्रस्तुत आत्मकथनात्मक मांडला आहे. शिक्षणात अनेक अडथळे येत असले तरी त्यांनी शिक्षणाची कास सोडली नाही. हे सर्व होत असताना एका पुरुषाचे स्त्री मध्ये होणारे रूपांतर ही कहाणी वाचकांना सुन्न करणारी आहे.

एकूणच, तृतीयपंथीय अथवा पारलिंगी साहित्याचा अभ्यास केल्यानंतर दिसून येते की, सामान्य जीवन जगणाऱ्या व्यक्तींपेक्षा तृतीयपंथीयांचे जीवन वेगळे आहे. त्यांचे जगणे, त्यांचे दुःख, त्यांच्या वेदना यांचा जेव्हा आपण वास्तवाच्या पातळीवर जाऊन अभ्यास करायला लागतो तेव्हा त्यांची जीवन कहाणी सुन्न करणारी आहे. त्यांच्या साहित्यातून संवेदनशील मनाचे चित्रण होते. प्राचीन, धर्मग्रंथात तृतीयपंथीयांचे फक्त वर्णनात्मक चित्रण आलेले आहे. परंतु सध्याच्या त्यांच्या साहित्यात त्यांनी जे भोगलं, सोसलं याचे चित्रण आले आहे. समाजाकडून त्यांची होणारी अवहेलना त्यांच्या साहित्यात येते. माणसांना ज्यांचा स्पर्श सुध्दा नकोसा वाटतो असे जीवन तृतीयपंथी जगतात. ते स्वतः पुरुष असतात परंतु लैंगिकदृष्ट्या कमकुवत असल्याने लहानपणापासून त्यांच्यात शारीरिक वेगळेपण जाणवते. तेव्हापासून समाजाच्या मानसिक आणि लैंगिक शोषणाला बळी पडावे लागते. हा सर्व तृतीयपंथीयांच्या साहित्याचा केंद्रबिन्दू आहे. वरील सर्व साहित्याचा अभ्यास केल्यानंतर तृतीयपंथीययांचे साहित्य हे इतर साहित्यापेक्षा वेगळे असल्याचे जाणवते. म्हणून त्यांचा साहित्य प्रवाह हा 'पारलिंगी साहित्यप्रवाह या नावाने वेगळा मानला पाहिजे.

**निष्कर्ष:**

१) तृतीयपंथीयांचे चित्रण अण्णा भाऊ साठे यांनी बरबाद्या कंजारी या त्यांच्या साहित्यकृतीत मराठीत प्रथम केले.

२) तृतीयपंथीयांच्या साहित्याचा पारलिंगी साहित्य प्रवाह या नावाने नवीन साहित्य प्रवाह मानला पाहिजे.

३) तृतीयपंथीयांचे साहित्य नवीन जीवन जाणिवा घेऊन मराठी साहित्यात रुजत आहे.

४) मराठी लेखकांनी आपल्या साहित्यात खूप कमी लेखन तृतीयपंथीयांवर केले.

५) तृतीयपंथीयांच्या साहित्यात माणूसकीचा गहिवर आहे.

**संदर्भ:**

१) आपटे वामन शिवराम, बृहद संस्कृत, पृ. 399.

२) ऑक्सफर्ड डिक्शनरी, पृ. २४४.

३) पॉली दिलबाग ॲडव्हान्स लर्नर्स डिक्शनरी, पृ. ९५०

४) ऑक्सफर्ड डिक्शनरी पृ. ३६

५) अमित कुमार, मी हिजडा, मी लक्ष्मी, यातील मानवता, अपनी माती, चित्तौडगढ, २०१३ पृ. ०४.

६) गवस राजन, मेहता पालिशिंग हाऊस, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, मलपृष्ठ